• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३२४ • रविवार,दि.२५ फेब्रुवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 324 • Sunday 25 Feb 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
|बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्यास फाशी

नवी दिल्ली । वृत्तसेवा

केंद्र सरकारने ३ फौजदारी कायदे १ जुलै पासून लागू होणार असल्याची अधिसूचना शुक्रवारी (दि.२४) जारी केली आहे. नवे फौजदारी कायदे भारतीय दंड संहितेची जागा घेणार आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी डिसेंबर २०२३ मध्ये या कायद्यांना मंजूर दिली होती. त्यामुळे या नव्या कायद्यांची निर्मिती झाली होती. या कायद्यांनुसार, झुंडबळी म्हणजेच ५ किंवा त्यापेक्षा अधिक लोकांच्या समूहाने एकत्रित येत जातीय भेदभावामुळे कोणाचीही हत्या केली तर समुहातील प्रत्येक सदस्याला जन्मठेप म्हणजेच आजीवन कारावासाची शिक्षा दिली जाईल. शिवाय अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्यासही गुन्हेगारांना फाशीची शिक्षा दिली जाऊ शकते. केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी झुंडबळी हा घृणास्पद गुन्हा असल्याचे म्हटले होते. त्यामुळे गुन्हेगारांना कायद्यात फाशीची तरतूद असावी, असे मत शाह यांनी संसदेत मांडले होते.





केंद्र सरकारने पारित केलेल्या नव्या कायद्यांचा मुख्य उद्देश देशातील फौजदारी न्याय प्रणाली बदलणे हा आहे. त्यामुळे इंग्रजांच्या काळातील कायद्यांमध्ये एकप्रकारे सुधारणा करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे. नव्या कायद्याने राजद्रोहाचे कायदे नष्ट करण्यात आले आहेत. केंद्र सरकारने राजद्रोहाचे कलम १२४ (क) रद्द केले आहे. मात्र, राजद्रोहाच्या जागी देशद्रोहाने घेतली आहे. नव्या कायद्यानुसार, राज्यसंस्थेविरोधात गुन्हे करणाऱ्या विरोधात नवे कलमांचा समावेश करण्यात आलाय. या कायद्यान्वये, देशद्रोहामध्ये सशस्त्र बंड, विध्वंसक कारवाया यांसारख्या गुन्ह्यांचा समावेश आहे. देशाची एकता आणि अखंडतेविरोधात कारवाया करणाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली जाणार आहे. नव्या कायद्यानुसार, तोंडी किंवा लिखित शिवाय सांकेतिक रुपाने देशविरोधी कारवायांना पाठबळ देत देशाची एकता आणि अखंडता धोक्यात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

# राज्यातून परळीत एकवटणार सकल ब्राह्मण समाज

परळी । प्रतिनिधी

पंचम ज्योतिर्लिंग क्षेत्र परळी वैजनाथ येथून सकल ब्राह्मण ऐक्याचा 'हुंकार' पुकारण्यात आला आहे. परळी वैजनाथ येथे आज २५ फेब्रुवारीला राज्यस्तरीय ब्राह्मण ऐक्य परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.संपूर्ण एक दिवस भरगच्च कार्यक्रम होणार असुन राज्याचे कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे, भाजप राष्ट्रीय सचिव माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. परिषदेसाठी संत-महंतांचे आशीर्वच व विविध क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती राहणार आहे. राज्यातून सकल ब्राह्मण समाज एकवटणार असुन मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन परिषदेचे निमंत्रक व स्वागताध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केले आहे. पंचम ज्योतिर्लिंग क्षेत्र परळी वैजनाथ येथील हालगे गार्डन येथे दि.२५ फेब्रुवारी २०२४ रोजी एक दिवशिय राज्यस्तरीय ब्राह्मण ऐक्य परिषद सकाळी ९ ते सायं.७ या वेळेत होणार आहे. सकाळी ९.३० वाजता धर्मध्वज पूजन व ध्वजारोहण सोहळा होईल.सकाळी १०.०० वा.उद्घाटन सोहळा होणार असुन उद्घाटक म्हणून ना.श्री. धनंजय मुंडे (कृषीमंत्री- महाराष्ट्र राज्य पालकमंत्री, बीड जिल्हा),पंकजाताई मुंडे (माजी मंत्री तथा राष्ट्रीय सचिव-भाजपा) हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी नमिताताई मुंदडा (सदस्य - केज विधानसभा) या उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे प.पू. सुधीरदास महंत (काळाराम मंदिर, नाशिक), धर्मगुरु प.पू.अमृताश्रम स्वामी महाराज, प.पू विनायक महाराज फुलंब्रीकर,प.पू. बहुसोमयाजी श्री. यज्ञेश्वर सेलुकर महाराज यांचे आशिर्वचन होणार आहे. या सत्रात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रेरणा पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. यामध्ये राष्ट्रीय कीर्तनकार स्व.श्री. भरतबुवा रामदासी स्मृती राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्कार मोहन धुंडिराज दाते (पंचांगकर्ते, सोलापूर) यांना, भागवताचार्य स्व. श्री. वा. ना. उत्पात स्मृती राज्यस्तरीय प्रेरणी पुरस्कार डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी (प्रशासकीय अधिकारी, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,) यांना तर रणरागिणी स्व.ड. अपर्णाताई रामतीर्थकर स्मृती राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्कार सौ. उज्ज्वला जितेंद्र शर्मा-गौड (संस्थापक अध्यक्षा रणरागिणी महिला विचार मंच, पुणे ) यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# भाजपाच्या चिन्हावर लढणार नाही

मुंबई । वृत्तसेवा

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आरपीआयचे प्रमुख व केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी मोठे विधान केले आहे. आता वातावरण चांगले आहे. मला शिर्डीतून निवडून येण्याची संधी आहे. मी भाजपाच्या चिन्हावर लढणार नाही. आम्हाला लोकसभेसाठी जागा द्यावी हा आमचा आग्रह आहे. भाजपाने आम्हाला सिरियसली घ्यावे. लोकसभेसाठी तिकीट नाही दिलं तरी मी एनडीएमधून बाहेर पडण्याचा संबंध नाही, असे विधान रामदास आठवले यांनी केले. आगामी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनीही मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली



आहे. शनिवारी रामदास आठवले यांनी मुंबईत पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी रामदास आठवले म्हणाले, विरोधक पंतप्रधान नरेंद्र मोदींना शिव्या देत आहेत. आम्ही त्यांच्या पाठिशी ताकदीने उभे राहिलो आहोत. एनडीएने आम्हाला एक जागा तरी सोडावी. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजपाला फायदा झाला होता. आमच्या पक्षाला विसरून चालणार नाही. त्यामुळे माझी लोकसभेसाठी शिर्डीच्या जागेवरून उभे राहण्याची इच्छा आहे. आमचे नेते म्हातेकर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटले आहेत. त्यांनी आमची भावना त्यांच्यापर्यंत पोहोचवली आहे, असे रामदास आठवले यांनी स्पष्टपणे सांगितले. याचबरोबर, मार्चच्या पहिल्या आठवड्यात आचारसंहिता लागेल आणि एप्रिलमध्ये निवडणुका होतील. आम्ही ४०० जागा जिंकू. अलीकडे झालेल्या पाचही राज्यात भाजपाला चागलं यश मिळालं. मागच्या वर्षात केलेली काम, महिलांसाठी केलेली काम, ३७० कलम हटवण्याचं काम केले. आणखीही कामे करण्यात आलेली आहेत, असे रामदास आठवले यांनी सांगितले.

# राज्यात ४२ लोकसभा मतदार संघांमध्ये जिंकू

सांगली । वृत्तसेवा

भाजप गॅरंटी शब्द वापरत आहे. पण हा शब्द आमचा असून त्यांनी चोरला आहे. या गॅरंटीला त्यांनी अपमानीत केले आहे. त्यांची गॅरंटी आता संपली आहे, असा टोला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपला लगावला. तसेच धर्म, जातीच्या नावावर राजकारणाचा एक अजेंडा वापरण्याचे काम सुरू असल्याचाही आरोप त्यांनी केला. सातारा जिल्हा दौऱ्यावर आल्यानंतर काँग्रेस कमिटीत आयोजित पत्रकार परिषदेत प्रदेशाध्यक्ष नाना पटोले बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, जिल्हा प्रभारी श्रीरंग



चव्हाण, सरचिटणीस नरेश देसाई, महिला काँग्रेस जिल्हाध्यक्षा अल्पना यादव आदी उपस्थित होते. होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीसाठी राज्यातील जागा वाटपाचे काम जवळपास निश्चित झाले आहे. राज्यात आम्ही ४२ लोकसभा मतदारसंघांमध्ये आमचे उमेदवार जिंकतील, असा दावा पटोले यांनी यावेळी केला. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण आयुष्यभर काँग्रेससोबत राहिले. त्यांनीच राज्यात काँग्रेसचा खासदार एकवर आणून ठेवला, असा घणाघाती आरोप नाना पटोले यांनी केला. ते पुढे म्हणाले की, राज्यातील मराठा तसेच धनगर समाजाला आरक्षणाच्या नावाखाली २०१४ पासून देवेंद्र फडणवीस फसवत आहेत. भाजपकडून आरक्षणाचा बागुलबुवा केला जात आहे. मराठा आणि ओबीसीत वादाचे बीज भाजपनेच रोवले.

# कंपन्यांमुळे रोजगार निर्मिती होतेयं

नागपूर । वृत्तसेवा

केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या नेतृत्वात नागपुरात बड्या शिक्षणसंस्था एम्स, ट्रीपल आयटी, लॉ युनिव्हर्सिटी कार्यरत आहेत, याचा आनंद आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळेच नागपूरमध्ये मोठ्या कंपन्या येत आहेत, रोजगार निर्मिती होत आहे आणि नागपूरची आयटी हबच्या दिशेने वाटचाल होत असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. भारताला जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याकरिता माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील तरुणांची भूमिका महत्त्वाची असणार आहे, असेही ते म्हणाले. ज्या देशाकडे तेलाचा मुबलक साठा आहे तो देश पूर्वी श्रीमंत मानला जायचा. आज तेलाची जागा डेटाने घेतली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्राने मोठी क्रांती केली असून यात भारतीय तरुणांचे महत्त्व मोठ्या प्रमाणात आहे. भारताने



माहिती तंत्रज्ञानासह जैव तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही उत्तम प्रगती केली आहे. हे तंत्रज्ञान भारताचे भविष्य असल्याचे प्रतिपादन केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी केले. वारंगा (डोंगरगाव-बुटीबोरी) येथे भारतीय सूचना प्रौद्योगिक संस्था (ट्रिपल आयटी) स्थायी इमारतीचे गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह ट्रिपल आयटीचे संचालक ओमप्रकाश काकडे, कुलसचिव कैलाश डाखले यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. गडकरी म्हणाले, 'ज्ञान ही भारताची सर्वांत मोठी शक्ती आहे. आपले विद्यार्थी जगभरात आयटीच्या क्षेत्रात उत्तम काम करीत आहेत. नागपूरला आयटी हब म्हणून विकसित करण्यासाठी आपण पूर्ण शक्ती पणाला लावली आहे. मिहानमध्ये एचसीएल, टीसीएस, राफेल यासह आणखी मोठ्या कंपन्या आल्या आहेत. एव्हीएशनच्या क्षेत्रात एमआरओची सुविधाही आपण सुरू केली आहे. त्यामुळे नागपूर केवळ आयटी हब म्हणून नव्हे तर एव्हीएशन हब म्हणूनही विकसित होऊ लागले आहे. गुमगावच्या बाजुला आणखी जागा घेऊन मिहानचा विस्तार करता येईल का, याचा विचार आम्ही करतोय.' नागपुरात ट्रिपल आयटीच्या नव्या इमारतीचे व परिसराचे आज उद्घाटन होत आहे, ही आमच्यासाठी अत्यंत आनंदाची बाब आहे.देशात २० ट्रिपल आयटी स्थापन करण्याची चर्चा झाली तेव्हा मी शिक्षण मंत्र्यांना नागपूरचाही समावेश करण्याचा आग्रह केला होता, याचाही गडकरी यांनी आवर्जून उल्लेख केला. मिहानमध्ये येत्या काळात मेट्रो पोहोचणार आहे. आजच मी अंडरपास तयार करण्याचेही आदेश दिले आहेत. लवकरच इथे येणारा रस्ता सहा पदरी होईल. राज्य सरकारने मिहानच्या आत चार पदरी काँक्रिटचे रस्ते केल्यास कनेक्टिव्हिटी वाढेल, असेही गडकरी म्हणाले. देशातील सर्व मोठ्या शैक्षणिक संस्था आज नागपुरात आल्या आहेत. या संस्थांनांचा आपल्या प्रदेशाच्या प्रगतीसाठी उपयोग झाला पाहिजे. त्यासाठी प्रदेशाच्या क्षमता ओळखून त्यावर आधारित संशोधन झाले पाहिजे. तरच या गुंतवणुकीचा उपयोग आहे.

# मराठवाड्यात ३१९ टँकरने पाणी पुरवठा

संभाजीनगर । वृत्तसेवा

मराठवाड्यात पावसाचा खंड आणि अवकाळी पावसामुळे शेतकर्यांचे प्रचंड नुकसान झाले. नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यांना अतिवृष्टीचा फटका सहन करावा लागला आहे, तर उर्वरित सहा जिल्ह्यांत पावसाने दडी मारल्यामुळे पाणीप्रश्न भेडसावत आहे. सध्या मराठवाड्यात ३१९ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. तसेच मोठ्या धरणांमध्ये केवळ ३६ टक्केच जलसाठा शिल्लक राहिला आहे. कर्जबाजारी, नापिकी आणि वेगवेगळ्या कारणांतून मराठवाड्यातील १०९७ शेतकर्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यात मागील जानेवारी महिन्यातदेखील जालना जिल्ह्यातील १९ शेतकर्यांनी आत्महत्या केल्या



आहेत. यामुळे मराठवाड्यातील दुष्काळाची दाहकता अधिक तीव्र होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. जून-जुलै २०२३ या काळात पावसाला उशिरा सुरुवात झाली. यामुळे खरिपाच्या पिकांचे नुकसान झाले. जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड आणि लातूर येथील ६ लाख ४६ हजार २९५ शेतकर्यांना याचा फटका प्रामुख्याने सहन करावा लागला. त्यांच्या ५ लाख ९ हजार ७१६.६५ हेक्टरमधील जिरायत, बागायत आणि फळपिकांचे नुकसान झाले. याच काळात नांदेड आणि हिंगोली जिल्ह्याला अतिवृष्टीचा फटका सहन करावा लागला. त्यानंतर सप्टेंबरमध्ये गौरी-गणपतीच्या दरम्यान दमदार पाऊस झाला. त्यावर खरिपाच्या पिकांनी तग धरला. मात्र, पुढे पावसाने पुन्हा दगा दिल्यामुळे पिकांनी माना टाकल्या. आभाळाकडे डोळे लावलेल्या शेतकर्यांनी ऑक्टोबर महिन्यात रब्बीची पेरणी केली. या महिन्यात तुरळक पाऊस झाला. त्यावर पिकांची वाढ खुंटल्यामुळे शेतकर्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले. नोव्हेंबर महिन्यात कोसळलेल्या अवकाळी पावसाने आणि गारपिटीने वाढ झालेली पिकेही उद्धस्त केली. यामुळे बळीराजा पुरता हतबल झाला. दुष्काळामुळे पाणीप्रश्न अधिकच चिंतेचा बनला आहे. दुष्काळाची दाहकता पाहता ३८० विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे, तर छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांतील २५५ गावांना टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.

## संपादकीय

# सुधारणा गरजेच्या

लोकसभा निवडणुकीनंतर नव्या सरकारने काही महत्त्वाच्यां सुधारणांना कायदेशीर अधिष्ठान देणे आणि त्याची अमलबजावणी करणे गरजेचे आहे. कृषी, कामगार, भूमी आणि अन्य सुधारणांची गरज आहे. कामगार कायद्यात १९९० च्या दशकांत सुधारणा करणे गरजेचे होते आणि ते आतापर्यंत झालेले नाही. अधिक रोजगार निर्मितीसाठी अप्रेटिंस योजनांवर भर देण्याची गरज आहे. यामुळे कमी खर्चात मनुष्यबळ आणि कौशल्य मिळू शकते. शहरात अधिकाधिक रोजगार तयार करण्यासाठी केंद्र आणि राज्याच्या अधिनिस्त संस्था, नगरपालिका आणि स्थानिक संस्थांना जादा अधिकार द्यावे लागतील. नऊ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका ग्लोबल बिझनेस समिटमध्ये केंद्र सरकारच्या तिसर्या कार्यकाळात नवा भारत वेगाने काम करेल, असे विश्वास व्यक्त केला. भारत जगातील तिसरी मोठी आर्थिक शक्ती म्हणून नावारुपास येत असल्याचे दिसत आहे. आपला अर्थिक विकासाचा दर सतत वाढत असून महसुल तुट कमी होत आहे. उत्पन्न वाढविणे आणि गरीबी कमी करण्याचा हा काळ आहे. २५ कोटी नागरिक गेल्या दहा वर्षांत गरिबीच्या बाहेर आले आहेत. मोदी म्हणाले, आपल्या सरकारने सर्व धोरणात स्थैर्य आणि सातत्य राहण्यावर अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. प्रत्येक बजेटमध्ये चार गोष्टींवर अधिक भर दिला गेला. पायाभूत सुविधांचा विकास, उत्पादन वाढविण्यासंदर्भात खर्चात विक्रमी तरतूद करणे, कल्याणकारी योजना, अनाठायी खर्चांना लगाम व आर्थिक शिस्त. त्याचे उत्साहजनक परिणाम मिळाल्याचे पंतप्रधान म्हणाले. ८ फेब्रुवारी रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनीही लोकसभेत मोदी सरकारच्या कार्यकाळाची माहिती देणारी श्वेतपत्रिका मांडली. यात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली दहा वर्षात आर्थिक विकास वेगाने झाला असल्याचे म्हटले आहे. या सुधारणा जन धन योजना, आधार आणि मोबाईल आधारित अंशदान वितरणात सुधारणा (जेएएम), जीएसटी तसेच कर्जवसुली आणि वाटप सुधारणा आणि दिवाळखोरी संहिता (आयबीसी) याचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. जागतिक पातळीवर प्रत्यक्ष परकी

गुंतवणुकीतील घसरणीचा माहोल असताना भारत मात्र जगातील सर्वाधिक परकी गुंतवणूक मिळवणार्या देशांत सामील झाला आहे. भारताचा परकी चलनसाठा वेगाने वाढला आहे. भारतीय शेअर बाजार हा जगात सर्वात उच्चांकी पातळीवर असल्याचे सांगत आहे. देशात २०१४ मध्ये २३४ सार्वजनिक उपक्रम होते आणि आज त्याची संख्या २५४ झाली आहे. उद्योग, कृषी, सेवा क्षेत्राचा देखील वेगाने विकास झाला आहे. भारत आर्थिक विकासासह जागतिक शक्ती म्हणूनही समोर आला आहे. जागतिक विकासाचे इंजिन म्हणून भारताकडे पाहिले जात आहे. भारताकडे जागतिक कंपन्यांचा ओघ सुरू झाला आहे. तसेच देशाच्या विकासात आर्थिक शिस्तीने महत्त्वाची भूमिका बजावली, हे देखील पाहिले पाहिजे. जगातील प्रमुख जागतिक क्रेडिट रेटिंग संस्थांनी देखील केंद्र सरकारचे आर्थिक धोरण आणि अर्थसंकल्प हा विकासाला अनुकुल असल्याचे म्हटले आहे. यानुसार भारताचा विकास, भारतातील गुंतवणूक आणि भारताची आर्थिक स्थिती भक्कम होण्यास हातभार लागणार आहे. 'फिच' ने म्हटले, लोकसभा निवडणुकीच्या अगोदर सादर झालेला भारताच्या हंगामी अर्थसंकल्पात २०२४-२५ मध्ये महसूल तूट मागील दोन वर्षाच्या तुलनेत वेगाने कमी करण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. त्याचबरोबर भांडवली तरतूद देखील वाढली आहे. आता नव्या सरकारकडून सादर होणार्या संपूर्ण अर्थसंकल्पात आर्थिक सुधारणांसंबंधी पावले टाकली जाईल, अशी अपेक्षा आहे. याप्रमाणे 'एसअँडपी' ने म्हटले, या काळात भारताची सॉव्हेरिन रेटिंग ही सरासरीच्या तुलनेत वरच्या पातळीवर आहे. भारताचे नवे सरकार व्यापक पायाभूत सुविधा योजनांवरील गुंतवणुकीत वाढ करून आर्थिक सुधारणा आणि अन्य भांडवली तरतुदीत भर घालेल व महसूल तूट कमी करण्यात यशस्वी ठरेल. याप्रमाणे भारताची रेटिंग आणखी सुधारेल. 'एसअँडपी'ने म्हटले, भारतात भाजपच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकार पुन्हा येत असेल तर धोरणात सातत्य राहू शकते. अशावेळी लोकसभा निवडणुकीनंतर नव्या सरकारने काही महत्त्वाच्यां सुधारणांना कायदेशीर अधिष्ठान देणे आणि त्याची अमलबजावणी करणे गरजेचे आहे. कृषी, कामगार, भूमी आणि अन्य सुधारणांची गरज आहे. कामगार कायद्यात १९९० च्या दशकांत सुधारणा करणे गरजेचे होते आणि ते आतापर्यंत झालेले नाही. केंद्र सरकारने २९ कामगार कायद्यांना चार कामगार कायद्यांत परावर्तित करण्याची महत्त्वकांक्षी योजना अस्तित्वात आणली. सरकारने इंडस्ट्रियल रिलेशन कोड २०२० ऑक्यूपेशन सेफ्टी, हेल्थ अँड वर्किंग कंडिनन्श कोड २०२०, कोड ऑन सोशल सिक्यूरिटी, २०२० आणि वेतन संहिता कोड २०१९ हे मागील वर्षात डिसेंबरमध्ये एकावेळी लागू करण्याचे संकेत दिले. मात्र ते अद्याप लागू झालेले नाहीत. या कायद्याच्या आधारे कामगारांना वेतनाची हमी, आरोग्य सुरक्षा आणि सामाजिक सुरक्षा देण्याच्या व्याप्तीत वाढ करण्यात आली आहे. त्यावेळी या कायद्यानुसार सध्याच्यां कामगार कायद्यातील कठोरपणा कमी करणे आणि नियमांची अनिवार्यता कमी करणे यासारख्या तरतूदी केल्या असून त्यानुसार उद्योग उभारणीची कटकटी कमी होतील आणि एकप्रकारे रोजगारवाढीला मदत मिळेल. नव्या प्रस्तावित कामगार कायद्यानुसार कामगारांना अनेक फायदे होत असल्याचे चिन्हे असताना त्याचेवळी उद्योजकांना व्यवसाय करणे अधिक सुलभ करण्यासाठी देखील अनेक तरतूदी केल्या आहेत. सध्याच्या काळात अनेक देशांतील कंपन्या चीनमधून स्थलांतरित होत असून उद्योगपुरक कामगार कायद्याच्या आधारे त्यांना आपल्याकडे आकर्षित करू शकतो. व्हिएतनाम, बांगलादेश आणि अन्य देशांतील लवचिक कामगार कायद्यामुळे त्यांना लाभ मिळताना दिसत आहे.

## जाहिर प्रगटन

**(मौजे सुंदरवाडी ता. जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येथील गट नं. 38 पैकी प्लॉट नं. 23 ज्याचे विक्री क्षेत्रफळ 1412.5 चौ. फूट (131.27 चौ.मी) खरेदी बाबत)**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **श्री. अण्णासाहेब दिगंबरराव फावडे रा. मालपाणीनगर, लगस्कर बिल्डिंग समोर, औसा रोड, लातूर** यांचे मालकी व ताब्यात असलेली खालील परिशिष्टातील नमूद मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचा करार केलेला आहे.

तरी सदरील मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचे हितसंबंध, गहाण, दान, बक्षीस, विक्री, इतर लीज, चोळी-बांगडी, उजर/आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून **सात (7) दिवसाच्या** आत मूळ कागदपत्रासह आपला उजर/आक्षेप लेखी स्वरूपात माझ्या खालील नमूद कार्यालयाच्या पत्त्यावर नोंदवावा व त्याची पोहोच घ्यावी. मुदतीत कुणाचाही उजर/आक्षेप न आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व दोषमुक्त आहे असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे परिशिष्ट : मौजे सुंदरवाडी ता. जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येथील गट नं. 38 पैकी प्लॉट नं. 23 ज्याचे विक्री क्षेत्रफळ 1412.5 चौ. फूट (131.27 चौ.मी)** कायमस्वरूपी खरेदी करण्याचा करार केला असून ज्याची चतु:सीमा खालील प्रमाणे.

**पूर्वेस : प्लॉट नं. 22, पश्चिमेस : 16'.6" रुंद रोड, दक्षिणेस : गट नं. 39 चा भाग, उत्तरेस : प्लॉट नं. 24.**

करिता हे जाहीर प्रगटन

दिनांक : 23/02/2024

जाहीर प्रगटन देणार मार्फत

**ॲड.संदीप गंगाधरराव देवगावकर**

पत्ता : प्लॉट नंबर 17, गुरुजन हाऊसिंग सोसायटी, वीर सावरकर चौक, छत्रपती संभाजीनगर.
मो. 9423777765 / 8329545311

**मा. ॲड. अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर**

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, डॉ. हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बालउदयानाच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता. जि. बीड. 431122.

(मल्टीस्टेट को. ऑप, सोसायटीज ॲक्ट 2002 आणि अब्रिट्रेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

जा.क. दिनांक 01/02/2024

**जाहीर नोटीस**

अर्जदार : नाथ मल्टीस्टेट को. ऑप, क्रेडिट सोसायटी लि. मालेगाव (खुर्द) ता. गेवराई जि. बीड

**विरूध्द – गैरअर्जदार**

1. लवाद अर्ज क्र. 536/2022 (1) शिवप्रकाश भगवान काकडे रा. जयभवानी सहकारी साखर कारखाना लि. गढी ता. गेवराई जि. बीड (कर्जदार) (2) संतोश प्रल्हाद शिंदे रा. खांडवी ता. गेवराई जि बीड. (3) दत्ता भगवान काकडे रा. निपाणीजवळ, जळगाव पो. पाचेगाव ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

2. लवाद अर्ज क्र. 540/2022 (1) विश्वनाथ संदिपान लांडे (कर्जदार) (2) परमेंश्वर कल्याण दुबाले दोघे रा. सांडरवण ता. जि बीड. (3) रितेश भिमराव जाधव रा. लोणी शहाजानपुर ता. जि. बीड (दोघे जामीनदार)

3. लवाद अर्ज क्र. 539/2022 (1) अरूण भगवान आहेर (कर्जदार) (2) भगवान नाथा आहेर (3) विठठल रोहीदास आहेर रा. म्हाळस पिंपळगाव पो. राक्षसभुवन ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

4. लवाद अर्ज क्र. 538/2022 (1) मच्छिंद्र केशव खराद (कर्जदार) (2) महेश मच्छिंद्र खराद (3) सावता सिताराम दुधसागर रा. सर्व मालेगाव खुर्द ता गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

5. लवाद अर्ज क्र. 523/2022 (1) प्रभाकर दगडु घोंगडे (कर्जदार) (2) गंगासागर प्रभाकर घोंगडे (3) संजय किसनराव गोर्डे रा. सर्व बालानगर ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

6. लवाद अर्ज क्र. 535/2022 (1) ज्ञानेश्वर सर्जेराव मोटे (कर्जदार) (2) दिपक सर्जेराव मोटे दोघे रा. ताकडगाव पो. केकत पांगरी ता गेवराई जि बीड. (3) अशोक शिवाजीराव शेळके रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

7. लवाद अर्ज क्र. 527/2022 (1) गोरख त्रिबंक फोपसे (कर्जदार) (2) गोरख सुधाकर गोर्डे (3) दत्तात्रय त्रिबंक फोपसे रा. बालानगर ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

8. लवाद अर्ज क्र. 526/2022 (1) किशोर बबन काळे (कर्जदार) (2) सोनाली किशोर काळे (3) गणेश शंकर रूळे रा. बालानगर ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

9. लवाद अर्ज क्र. 210/2023 (1) अनिल सर्जेराव चोरमले (कर्जदार)(2) राधाकिसन बाबुराव बुडखे (3) ज्ञानेश्वर बाबासाहेब मस्के रा. सर्व कांबी ता. शेवगाव जि. अहमदनगर (दोघे जामीनदार)

10. लवाद अर्ज क्र. 169/2023 (1) भाउसाहेब लक्ष्मण काशिद (कर्जदार)(2) अशोक लक्ष्मण काशिद रा. दोघे सुकळी ता. शेवगाव जि. अहमदनगर (3) बाळु भिवराज घोडके रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

11. लवाद अर्ज क्र. 494/2022 (1) सईदा बेगम पिरमहंमद पठान रा. आझाद नगर, शाहुनगर, बीड (कर्जदार) (2) शेख फरजाना शेख महेबुब रा. काझी नगर, बालेपीर, बीड (3) नसरिन बेगम मोमीन सलीम रा. देवी मंदिर, खासबाग, बीड ता. जि. बीड (दोघी जामीनदार)

12. लवाद अर्ज क्र. 476/2022 (1) विदया संजय वडमारे रा. आशा टॉकीजजवळ, बीड (कर्जदार) (2) कांता सखाराम गायकवाड रा. सेंटर नं ऐ 3–2, हिदुंस्तान आवास, पैठण रोड, नक्षत्रवाडी, ता. जि. औरंगाबाद (3) छाया अशोक साबळे रा. भिमराज नगर, राजुरी वेस, बीड (दोघी जामीनदार)

13. लवाद अर्ज क्र. 167/2023 (1) सुनिल जगन्नाथ औटे (कर्जदार)(2) राहुल सुनिल औटे दोघे रा. मालेगाव खुर्द ता. गेवराई जि. बीड (3) धर्मराज गणपत माने रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

14. लवाद अर्ज क्र. 542/2022 (1) संजय भगवान कनके (कर्जदार)(2) आत्माराम विठठल कनके(3)गणेश काशिनाथ कनके रा. भांबेरी ता. अंबड जि. जालना (दोघे जामीनदार)

15. लवाद अर्ज क्र. 551/2022 (1) विलास आश्राजी पाटील रा. ताकडगाव रोड, माउली नगर, गेवराई ता गेवराई जि. बीड (कर्जदार)(2) भाउसाहेब सिताराम शेंबडे रा. तांदळा ता. गेवराई जि. बीड (3) अनंता प्रभाकर धोंडरे रा. जातेगाव ता. गेवराई जि. बीड (4) जयसिंग अनुरूद्र सोलाट रा. गौंडगाव ता. गेवराई जि. बीड. (तीघे जामीनदार)

16. लवाद अर्ज क्र. 550/2022 (1) विष्णु रामकिसन टेकाळे (कर्जदार)(2) नानासाहेब ज्ञानदेव टेकाळे दोघे रा. जळगाव केकत ता. पैठण जि. औरंगाबाद (3) किशोर विक्रम गोजरे रा. वडजी ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

17. लवाद अर्ज क्र. 549/2022 (1) दिनकर अप्पाजी गोजरे (कर्जदार)(2) किशोर विक्रम गोजरे दोघे रा. वडजी ता. पैठण जि. औरंगाबाद (3) नानासाहेब ज्ञानदेव टेकाळे रा. जळगाव केकत ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

18. लवाद अर्ज क्र. 548/2022 (1) किशोर विक्रम गोजरे (कर्जदार)(2) कांता दिनकर गोजरे दोघे रा. वडजी ता. पैठण जि. औरंगाबाद (3) नानासाहेब ज्ञानदेव टेकाळे रा. जळगाव केकत ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

19. लवाद अर्ज क्र. 547/2022 (1) भागवत मोहन नरवडे (कर्जदार) (2) ज्ञानेश्वर मारोती थोटे(3) प्रभाकर बप्पासाहेब काळे रा. सर्व चौंढाळा ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

20. लवाद अर्ज क्र. 646/2022 (1)राजेंद्र अशोक खराद(कर्जदार)(2) छडीदार गणेश बाबासाहेब(3) दादासाहेब अशोक खराद रा. सर्व सोलनापुर ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

21. लवाद अर्ज क्र. 645/2022 (1) शेख पीर महंमद रज्जाक (कर्जदार) (2) कैलास वामन चोरमले(3) शेख लता रज्जाक रा. सर्व कांबी शेवगाव जि. अहमदनगर (दोघे जामीनदार)

22. लवाद अर्ज क्र. 541/2022 (1) विशाल बाळासाहेब आवारे (कर्जदार) (2) गणेश बाळासाहेब आवारे (3) गणेश पांडुरग घोरतळे रा. सर्व विहामांडवा ता. पैठण जि औरंगाबाद (दोघे जामीनदार)

23. लवाद अर्ज क्र. 544/2022 (1) शेख अपलातुल निजाम (कर्जदार) (2) शेख शकीला निजाम (3) रामकिसन लक्ष्मण मोरे रा. सर्व विहामांडवा ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

24. लवाद अर्ज क्र. 454/2022 (1) बबीता दगडु वीर रा. तळवट बोरगाव ता. गेवराई जि. बीड (कर्जदार) (2) आशा भाउसाहेब वाघमारे(3) सोनाली प्रदिप वाघमारे रा. महाराष्ट्र बॅंक कॉलनी, शिंदे नगर, बीड ता. जि. बीड (दोघे जामीनदार)

25. लवाद अर्ज क्र. 70/2023 (1) नवनाथ कुंडलिक गवारे (कर्जदार) (2) नंदाबाई नवनाथ गवारे (3) परमेश्वर भिवराज मोरकर रा. सर्व गुळज ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

26. लवाद अर्ज क्र. 68/2023 (1) शेख अन्सर खाजामिया (कर्जदार) (2) शेख बाबु महेबुब(3)शेख मन्सुर पापा रा. सर्व गुळज ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

27. लवाद अर्ज क्र. 69/2023 (1) शेख मन्सुर पापा (कर्जदार) (2) शेख बाबु महेबुब (3) शेख अन्सर खाजामिया रा. सर्व गुळज ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

28. लवाद अर्ज क्र. 71/2023 (1) उध्दव गोविंदराव ठोसर (कर्जदार) (2) भागवत सुभाष पाचे (3) सारंगधर गोविंद ठोसर रा. सर्व गुळज ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

29. लवाद अर्ज क्र. 73/2023 (1) मनोहर साहेबराव मस्के (कर्जदार) (2) गोरख मनोहर मस्के (3) सुनिल प्रल्हाद मस्के रा. सर्व गुळज ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

30. लवाद अर्ज क्र. 75/2023 (1) विष्णु राजाराम आंधळे (कर्जदार) (2) पोपट रघुनाथ सोनवणे (3) रंजना विष्णु आंधळे रा. सर्व गुळज ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

31. लवाद अर्ज क्र. 78/2023 (1) नितीन शरद गवारे (कर्जदार) (2) शिवाजी संपत गवारे (3) बाळासाहेब अनिल चव्हाण रा. सर्व गुळज ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

32. लवाद अर्ज क्र. 79/2023 (1) सुनिता नितेश नरवडे (कर्जदार) (2) मिरा संतोष नरवडे दोघे रा. सातारा गाव, सातारा परिसा, औरंगाबाद ता जि. औरंगाबाद (3) राम जिजा काळे रा. मल्हार वाडी, सातारा गाव ता. जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

33. लवाद अर्ज क्र. 80/2023 (1) कल्याण सोपान कुंडकर रा. भाटेपुरी पो. खांडवी ता. गेवराई जि. बीड (कर्जदार) (2) नरहरी संताराम नाईक रा. धनगर गल्ली, घनसांगवी ता. घनसांगवी जि. जालना (3) सतलिंग राम समशेटे रा. घर नं 83/1, गिता विदयालयाजवळ, सिडको, गारखेडा परिसर, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

34. लवाद अर्ज क्र. 82/2023 (1) प्रशांत छगनराव गाडेकर (कर्जदार) (2) छगन नागराव गाडेकर दोघे रा. क्रांतीचौक पोलिस स्टेशन मागे, शिवाजी कॉलनी, समता नगर, औरंगाबाद(3)अमोल हरीभाउ तायडे रा. प्लॉट नं 6, सर्वे नं 94, 6–सी रेसिडन्सी कॉलनी, राम मंदिरामागे, देवळाई, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

35. लवाद अर्ज क्र. 85/2023 (1) सचिन विनायक साळवे (कर्जदार) (2)प्रतिक्षा सुरेश धुमाळ रा. डी–15, 548, अंबेकर किराणा जवळ, नागसेन नगर, औरंगाबाद (3) आनंद रमेश मिसाळ रा. घर नं 6 लाईन नं 5, तायरभाई फलोअर मिल जवळ, नागसेन नगर, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद(दोघे जामीनदार)

36. लवाद अर्ज क्र. 84/2023 (1)गोपीनाथ सदाशिव आंधळे (कर्जदार) (2) सदाशिव किसन आंधळे (3) बाळासाहेब सदाशिव आंधळे रा. सर्व आंधळेवाडी ता. केज जि. बीड (दोघे जामीनदार)

37. लवाद अर्ज क्र. 83/2023 (1) सचिन श्रीरंग दुबे रा. नागसेन नगर, गल्ली नं 4, उस्मानपुरा, औरंगाबाद (कर्जदार) (2) ज्ञानेश्वर वसंत सोनवणे रा. ग्रामपंचायत जवळ, सातारा गाव औरंगाबाद (3) अशोक दशरथ काळे रा. प्लॉट नं 21, गट नं 105, साई नगर, अयप्पा मंदिराजवळ औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

38. लवाद अर्ज क्र. 81/2023 (1) अजिम बशिर शहा रा. ग्रामपंचायत जवळ, सातारा खंडोबा, औरंगाबाद(कर्जदार) (2) बबन तुकाराम शेजुळ रा. प्लॉट नं 11 गट नं 171, पंचवटी होम सोसायटी, पी डी जवळकर शाळेजवळ, औरंगाबाद (3) राजु अशोक पवार रा. बाळापुर ता. बायपास रोड, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

39. लवाद अर्ज क्र. 297/2023 (1) कावेरी राजेंद्र काळे(कर्जदार) (2) राजेंद्र बाबुराव काळे.(3) प्रकाश हरीभाउ काळे रा. चौढाळा ता. पैठण जि. औरंगाबाद (दोघे जामीनदार)

40. लवाद अर्ज क्र. 299/2023 (1) रजनीश प्रकाश कनके (कर्जदार) (2) सुखदेव हरीभाउ मुळे (3) सोपान रामदास केजभट रा. सर्व भांबेरी ता. अंबड जि. जालना (दोघे जामीनदार)

41. लवाद अर्ज क्र. 390/2023 (1) शिवाजी भगवान गारूळे (कर्जदार) (2) अनिल पांडुरंग बर्वे रा. (3) विठठल भाउसाहेब गारूळे रा. दहयाळा ता. अंबड जि. जालना (दोघे जामीनदार)

42. लवाद अर्ज क्र. 234/2023 (1) अभिजीत सुंदरराव इंदे (कर्जदार) (2) अविनाश सुंदरराव इंदे (3) सोमनाथ बापुसाहेब गरूड रा. सर्व माटेगाव ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

43. लवाद अर्ज क्र. 236/2023 (1) तुकाराम पुरूषोत्तम कुलकर्णी (कर्जदार) (2) ज्ञानेश्वर रामराव हिंगे (3) अभिजीत सुंदरराव इंदे रा. सर्व माटेगाव ता. गेवराई जि. बीड(दोघे जामीनदार)

44. लवाद अर्ज क्र. 237/2023 (1) महादेव आसाराम औटी (कर्जदार) (2) सुरेखा राजाभाउ औटी रा. दोघे बोरी पिंपळगाव ता गेवराई (3) संतोष रावसाहेब दिलवाले रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

45. लवाद अर्ज क्र. 238/2023 (1)शंकर बबनराव औटी (कर्जदार) (2) सुहास कल्याणराव औटी (3) ऋशिकेश रामराव देशमुख रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

46. लवाद अर्ज क्र. 239/2023 (1) विकास विक्रम शिंदे (कर्जदार) (2) सुर्दशन रत्नाकर जाधव रा. खळेगाव ता गेवराई (3) शेखर सुधाकर आहेर रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

47. लवाद अर्ज क्र. 240/2023 (1) मोहन नाराण निकम (कर्जदार) (2) विजय बंकट जगताप (3) तुकाराम हरीभाउ पायगुडे रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

48. लवाद अर्ज क्र. 241/2023 (1) स्वप्निल दादासाहेब औटी (कर्जदार) (2) मोहन नारायण निकम (3) विजय बंकट जगताप रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड (दोघे जामीनदार)

सदर नोटीसव्दारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूध्द वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावणी नोटीस आपणापैकी काहींनी घेवून गैरहजर राहिलात, काहींनी नोटीस नकार दिला तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच काहींच्या नोटीसा तामिल होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशीकामे आपण **दि. 13/03/2024** रोजी सकाळी तुम्ही अथवा तुमच्या वकिलांमार्फत लवाद न्यायाधिकरण कार्यालयास न चुकता हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास, त्या बाबतीत तुमचे काहींही म्हणणे नाही, असे समजून तुमच्या विरूध्द लवाद अर्जाचा एकतर्फी हुकुम / आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस माझी सही व शिक्यानिशी दिली आहे.

ॲड. अजित एम. देशमुख,
लवाद अधिकारी, बीड

शिक्का

# भाजप घटक पक्ष मिळून ४१ पेक्षा जास्त जागा जिंकू

**मुंबई । वृत्तसेवा**

उद्धव ठाकरे यांचा विषय आमच्यासाठी संपला आहे, आता पुन्हा ठाकरेंच्या शिवसेनेशी भाजपची युती होणार नाही, अशा शब्दात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे गटासाठी महायुतीचे दरवाजे बंद झाल्याचे स्पष्ट संकेत शुक्रवारी दिले. शिवसेनेसोबत केलेली युती ही भावनिक असून राष्ट्रवादीसोबत केलेली युती म्हणजे राजकीय डावपेच होते, याचा पुनरूच्चारही फडणवीस यांनी केला. शरद पवारांनी भाजपसोबत युती करण्यासाठी संमती दिली होती. मात्र, प्रत्यक्ष युती करण्याची वेळ आली तेव्हा त्यांनी माघार घेतली, असा दावाही त्यांनी पुन्हा केला. अशाप्रकारे तुम्ही मला पुढे करून सर्व गोष्टी ठरवल्यात आणि शेवटच्या क्षणी तुम्ही मागे हटत आहात, हा विश्वासघात मी सहन करू शकत नाही, अशी भूमिका अजित पवार यांनी यावेळी घेतली व ते सरकारमध्ये आले, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात ते बोलत होते. फडणवीस यांनी या मुलाखतीत उद्धव ठाकरेंचे नाव न घेता त्यांनी पाठीत खंजीर खुपसल्याचा आरोप केला. ते म्हणाले, २०१९ ला जनतेने आम्हाला बहुमताचे सरकार दिले; पण ते घटनाबाह्य पद्धतीने बेदखल करण्यात आले. २०१९ मध्ये जनतेचा जनादेश नाकारला गेला नसता, आमच्या पाठीत खंजीर खुपसला गेला नसता, तर कदाचित आज जी राजकीय परिस्थिती दिसते ती दिसली नसती. राज्यात तेव्हाच खूप चांगले स्थिर सरकार आले असते. आम्ही परत आलो आहोत आणि स्थिर सरकार देत आहोत, येत्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात आव्हाने आहेत. हे मान्य करतानाच भाजप मित्रपक्ष मिळून ४१ पेक्षा जास्त जागा जिंकू, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला. आम्ही शरद पवारांशी बोललो तेव्हा



त्यांनी युतीला सहमती दर्शवली. अजित पवार यांना उमेदवारी दिली. पवारांनी चर्चा करून वाटाघाटी करण्याचे अधिकार अजित पवारांना दिले. आम्ही अजित पवारांसोबत सर्वकाही निश्चित केले. मात्र, शेवटच्या क्षणी शरद पवार का मागे हटले हे मला कळत नाही. आपल्याला दिल्लीपेक्षा मुंबईच बरी वाटत असल्याचे सांगत फडणवीस यांनी राज्याचे राजकारण सोडून देशाच्या राजकारणात जाणार असल्याची चर्चा फेटाळली. दिल्लीपेक्षा मुंबईचे वातावरण चांगले आहे, असेही फडणवीस म्हणाले. लोकसभा निवडणुकीत ४०० चा आकडा पार करण्याच्या प्रश्नावर ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशात खूप काम केले आहे. प्रत्येक जात, धर्म आणि वर्गाच्या लोकांना वाटतं की देशाला त्याच्या गंतव्यस्थानावर कोणी नेऊ शकत असेल तर ते मोदीच आहेत. त्यांच्यापुढे कोणताही पर्याय सध्या दिसत नाही.

## सदाभाऊ खोत लोकसभा लढवण्यासाठी सज्ज



सांगली – लोकसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी तयारीला सुरुवात केली आहे. लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी अनेकजण इच्छुक असल्याचं चित्र दिसत आहे. रयत क्रांती संघटनेचे प्रमुख सदाभाऊ खोत हे देखील लोकसभेच्या मैदानात उतरण्याची शक्यता आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत हातकणंगले मतदारसंघातून आपल्याला उमेदवारी मिळावी, अशी थेट मागणी माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे जाहीर मेळाव्यातून केली आहे. मागील लोकसभा निवडणुकीत आपल्याला उमेदवारी मिळणार होती, मात्र ऐनवेळी मतदार सघ हा शिवसेनेच्या वाटेला गेला. त्यामुळं मला उमेदवारी मिळाली नसल्याचे सदाभाऊ खोत म्हणाले. यावेळी मात्र, लोकसभा निवडणूक लढवण्याची स्पष्ट भूमिका खोत यांनी जाहीर केली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि महायुतीतील घटक पक्षांच्या उपस्थितीमध्ये सांगलीच्या इस्लामपूरमध्ये आयोजीत केलेल्या शेतकरी कामगार परिषदेमध्ये सदाभाऊ खोत यांनी ही मागणी केली. विशेष म्हणजे व्यासपीठावर हातकणंगले लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान शिवसेना शिंदे गटाचे खासदार धैर्यशील माने देखील उपस्थित होते. यावेळी खासदार माने यांना पैरा फेडण्याची आठवण देखील खोत यांनी करुन दिली.

## गरीबांची जन आरोग्य योजना सुद्धा भ्रष्टाचाराने बरबटली

नाशिक : जन आरोग्य योजनेमध्ये उपचार पाहिजे असतील, तर २० हजाराची लाचेची मागणी करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार छत्रपती संभाजीनगरमधून समोर आला असतानाच आता नाशिकमध्ये दोन खासगी डॉक्टर एसीबीच्या जाळ्यात अडकल्याने महात्मा फुले जन आरोग्य योजना सुद्धा लाचखोरांनी बरबटल्याचे समोर येत आहे. राज्य सरकारच्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेत शस्त्रक्रिया केल्याच्या बदल्यात लाच मागितल्याने दोन खासगी डॉक्टरांवर नाशकात कारवाई करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. ७ हजारांची लाच घेताना डॉक्टर महेश परदेशी आणि डॉक्टर महेश बुब एसीबीच्या ताब्यात अडकले आहेत. या प्रकरणात तक्रारदाराच्या आईच्या हातावर शस्त्रक्रिया करण्यता आली होती. निफाड तालुक्यातील पिंपळगावच्या धन्वंतरी हॉस्पिटलमध्ये सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. एसीबीची राज्यातील अशी पहिली कारवाई असावी, असे बोलले जात आहे.

## शेतकऱ्याकडून लाच घेणारा कारकून पोलिसांच्या ताब्यात

बीड – माजलगाव येथील उप विभागीय अधिकारी, शेतचारी अस्तरीकरण उप विभाग क्र १० मधील दप्तर कारकुनाने वैयक्तिक जलसिंचन विहीरी करिता नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी शेतकऱ्याकडून तीन हजार रूपयांची लाच घेतली. या कारकुनाला बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने शुक्रवारी दुपारी बेड्या ठोकल्या. शेख वसीम शेख शाफिक (वय ३३) असे लाच घेणाऱ्या कारकुनाचे नाव आहे. माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथील तक्रारदाराच्या वडिलांच्या नावे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जलसिंचन विहिर मंजूर झाली होती. ज्या शेतात मंजूर झाली त्या शेताचे अन डिमांड प्रमाणपत्र मिळण्यासाठी तक्रारदाराने उप विभागीय अधिकारी, शेतचारी अस्तरीकरण उप विभाग क्र १० यांच्याकडे अर्ज केला होता. ते देण्यासाठी या कार्यालयातील दप्तर कारकुन शेख वसीम याने ३ हजार ५०० रूपयांची लाच मागितली होती. तडजोडीअंती ३ हजार रूपचे घेण्याचे ठरले. एसीबीने खात्री करून शुक्रवारी दुपारी त्याला माजलगाव शहरात लाच घेताना रंगेहाथ पकडले. त्याच्याविरोधात माजलगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती.

## तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड येथे संत गाडगेबाबा यांना अभिवादन

बीड –येथील देवगिरी प्रतिष्ठान बीड संचालित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन येथे दि २३ फेब्रुवारी रोजी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अंधश्रद्धा आणि अस्वच्छता यांनी बुरसटलेल्या समाजाला कीर्तनासारख्या माध्यमाने समाज सुधारणा करणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचे विचार सर्वांना प्रेरणादायी आहेत त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करून याप्रसंगी तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन विभाग प्रमुख विद्या अवघडे, प्राध्यापक,कर्मचारी आणि सर्व विद्यार्थिनी यांनी अभिवादन केले.

# शेतकऱ्यांसाठी मोदी सरकार कर्दनकाळ ?

**मुंबई । प्रतिनिधी**

शेतकरी राजा हा अन्नदाता आहे. शेतीमालाला किमान आधारभूत हमीभावाची मागणी करून जनआंदोलन करतो, तर बीजेपी चे मोदी सरकार शासकीय यंत्रणेमार्फत आंदोलन चिरडण्यासाठी अश्रू धुराचे नळकांडी फोडतात, शेतकऱ्यावर लाठीचार्ज, मारझोड करतात, पाईप द्वारे पाण्याचा शेतकऱ्यावर तुफान मारा करतात, इंटरनेटची सेवा बंद केली असून बॅरिकेटस रोडवर लावले आहेत. खड्डे खोदून सिमेंट व लोखंडाचे खिळयाचे ब्लॉक रोडवर लावलेले आहेत कारण शेतकऱ्यांबरोबर असलेली सायकल मोटरसायकल बैलगाडी ट्रॅक्टर टेम्पो जेसीबी ट्रक इत्यादी वाहनांना दिल्लीकडे जंतर-मंतर मैदानावर जाऊ न देण्यासाठी मोठे षडयंत्र शेतकऱ्यांच्या आंदोलन दडपण्यासाठी मोदी सरकार अन्याय अत्याचार शेतकऱ्यावर करीत असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला . शेतकऱ्यांचा शेतातील खरीप रब्बीचा माल तयार झाला की परदेशातून मोदी सरकार आयातीला परवानगी देते त्यामुळे बाजारपेठेतील हमी भावा पेक्षा शेतकऱ्याचा माल व्यापारी कमी भावाने विकत घेतात. सर्वच शेतीमालावरील निर्यातीचे निर्बंध लादल्यामुळे भात कापूस बाजरी मका मुग शेंगदाणे तीळ मोहरी कांदा भाजीपाला फळे गहू ज्वारी तुरीचे भाव बाजारात पाडले जातात त्यामुळे शेतकरी चारी बाजूंनी संकटात सापडला आहे. केंद्र सरकारने शेतीमालाला किमान आधारभूत हमीभावाचा आधार द्यावा कारण शेतीवरील खते बी बियाणे कीटकनाशके औषधी मजुरी दैनंदिन उत्पादन खर्च लाईट बिल जीएसटी कर नैसर्गिक संकटे त्यामुळे शेती ही शेतकऱ्याला परवडत नाही या सर्व प्रश्नावर शेतकऱ्याला स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी शेतकऱ्यांसाठी लागू करा करीता भारत देशातील पंजाब हरियाणा उत्तर प्रदेश बिहार राज्यातील लाखो शेतकरी आंदोलनाच्या द्वारे दिल्लीकडे जंतर-मंतरवर जाऊ नये म्हणून केंद्र सरकारने वेगवेगळ्या प्रशासकीय यंत्रणेद्वारे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला. सन २०२० ला शेतकऱ्यांनी मोठे आंदोलन केले होते त्यावेळेस अनेक शेतकऱ्यांचा मृत्यू झाला, शेतकरी आंदोलनामुळे तीन कायदे शेतकऱ्याचे विरोधी होते ते मोदी सरकारला रद्द करावे लागले. केंद्र सरकारने किमान आधारभूत (एम एस पी) किमतीसाठी शेतकरी नेते व विरोधी पक्षाच्या नेत्यांना सोबत घेऊन स्वामीनाथन आयोगाच्या सर्व शिफारशी मंजूर करून ५०/नफा व शेतीमालाला हमीभाव देऊन खते बी बियाणे कीटकनाशके संदर्भात कडक कायदे करून पेरणीच्या वेळेस बोगस बी बियाणे निघाल्यास शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याची तरतूद करण्यात यावी. अतिवृष्टीचे, अनुदान व पिक विम्याचे पैसे तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्याचे आदेश देण्यात यावेत अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे केली.

**मा. ॲड. अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर**

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, डॉ. हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बालउदयानाच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता. जि. बीड. 431122.

(मल्टीस्टेट को. ऑप, सोसायटीज ॲक्ट 2002 आणि अब्रिट्रेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

जा.क्र. दिनांक 14/02/2024

**जाहीर नोटीस**

अर्जदार : चंद्रभागा अर्बन मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड

**विरूध्द – गैरअर्जदार**

1. लवाद अर्ज क्र. 155/2024 (1) संतोष मदन काळे रा. पिंपळगाव (कर्जदार) (2) शेख फारूक सुलतान (3) शेख वजिर शेख मेहेताब रा. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड (दोघे जामीनदार)
2. लवाद अर्ज क्र. 157/2024 (1) माणिक आश्रुबा लाटे (कर्जदार) (2) अशोक मंजुळा सुरवसे रा. दोघे बाभळगाव ता. माजलगाव (3) अनंत सुंदरराव पवार रा. तेलगाव ता. धारूर जि. बीड (दोघे जामिनदार)
3. लवाद अर्ज क्र. 158/2024 (1) चंद्रकला नवनाथ बडे(कर्जदार) (2) राहुल नवनाथ बडे (3) विक्रम गोपीनाथ बडे रा. सर्व चिंचवन ता. वडवणी जि. बीड (दोघे जामीनदार)
4. लवाद अर्ज क्र. 160/2024 (1) दिगांबर दत्तात्रय सवणे रा. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड (कर्जदार) (2) निलेश सुरेशराव बनसोडे रा. परळी ता. परळी जि. बीड (जामीनदार)
5. लवाद अर्ज क्र. 163/2024 (1) संतोष अंकुश डोंगरदिवे रा. वडगाव गुंधा ता. जि. बीड (कर्जदार) (2) मन्सुरी अन्सार अहमद निसार अहमद रा. पोलिस चौकी, बार्शी नाकाच्या पाठीमागे, बीड ता जि. बीड (3) लहु संदिपान राउत रा. कानडीमाळी ता. केज जि. बीड (दोघे जामीनदार)
6. लवाद अर्ज क्र. 164/2024 (1) ईश्वर एकनाथ बहीरे (कर्जदार) (2) कपिल भुजंगराव नाईकवाडे (3) विजय गोरख नाईकवाडे रा. सर्व हिवरगव्हाण ता. वडवणी जि. बीड (दोघे जामीनदार)
7. लवाद अर्ज क्र. 167/2024 (1) विलास प्रकाशराव लाखे (कर्जदार) (2) चंद्रशेखर अरूण लाखे (3) सुरेश अशोक देशमुख रा. सर्व खोडस ता. घारूर जि. बीड (दोघे जामीनदार)
8. लवाद अर्ज क्र. 168/2024 (1) सुरेश बब्रुवान बडे (कर्जदार) (2) सतिश मनोहर बडे दोघे रा. दुकडेगाव ता. वडवणी जि. बीड (जामीनदार)

सदर नोटीसव्दारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूध्द वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावणी नोटीस आपणापैकी काहींनी घेवून गैरहजर राहिलात, काहींनी नोटीस नकार दिला तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच काहींच्या नोटीसा तामिल होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशीकामे आपण **दि. 06/03/2024** रोजी सकाळी तुम्ही अथवा तुमच्या वकिलांमार्फत लवाद न्यायाधिकरण कार्यालयास न चुकता हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास, त्या बाबतीत तुमचे काहींही म्हणणे नाही, असे समजून तुमच्या विरूध्द लवाद अर्जाचा एकतर्फी हुकुम / आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस माझी सही व शिक्यानिशी दिली आहे.

शिक्का

ॲड. अजित एम. देशमुख,
लवाद अधिकारी, बीड

नमुना इ -४
(नियम १८ पहा)

**निवडणूक निर्णय अधिकारी : श्री.व्ही.एस.जगदाळे** **पदनाम : सहायक निबंधक, सहकारी संस्था,ता.केज,जि.बीड**

**सहकारी संस्थेचे नाव : केज तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ म.केज,ता.केज,जि.बीड**

**अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक : १२/०२/२०२४**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणूक) नियम २०१४ व सुधारित नियम २०१७ च्या नियम १८ प्रमाणे अधिकाराचा वापर करून आणि मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. जिल्हा सहकारी निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी जाहिर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सदस्यांच्या निवडीकरिता **मी व्ही.एस.जगदाळे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.केज,जि.बीड आणि मा. जिल्हा सहकारी** निवडणूक अधिकारी, बीड व मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या मान्यतेने **केज तालुका सहकारी खरेदी विक्री संघ म.केज, ता.केज,जि.बीड** यांच्या समितीच्या सदस्यांची सन २०२४ त २०१९ या कालावधीची निवडणूक घेण्याकरिता नियुक्त केलेला निवडणूक निर्णय अधिकारी याद्वारे **केज तालुका सहकारी खरेदी विक्री संघ म.केज, ता.केज, जि.बीड** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्याच्या करण्यासाठी निवडणुकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करून **दि. २५/०२/२०२४** पासून जाहिर करीत आहे. आणि सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या किंवा मतदार संघाच्या संबंधातील निवडणूक नियम करीत आहोत.

**अनुसूची**

| अ.क्र. | मतदार संघाचे नाव | | नामनिर्देश पत्रे दाखल करण्यासाठी शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा ) | नामनिर्देशशन पत्राच्या यादीची प्रसिध्दी | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक व वेळ | विधीग्राह्य नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक | निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीची प्रसिध्दी करणे | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणीचा दिनांक,वेळ व स्थळ | मतमोजणी निकाल घोषित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | संस्था मतदार संघ | ०५ | दि. २६/०२/२०२४ ते दि. ०१/०३/२०२४ सकाळी ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यत (निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात) | दि. २६/०२/२०२४ ते दि. ०१/०३/२०२४ जसे अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज दुपारी ४.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात) | दि.०४/०३/२०२४ सकाळी ११.०० पासून छाननी संपेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात) | दि. ०५/०३/२०२४ सकाळी ११ वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात) | दि.०५/०३/२०२४ ते १९/०३/२०२४ सकाळी ११.०० ते दु. ३.०० वा.पर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात) | दि.२०/०३/२०२४ सकाळी ११.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात) | दि. ३१/०३/२०२४ वेळ सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.०० वा.पर्यंत स्थळ - मतदान ठिकाण नंतर जाहिर करण्यात येईल. | दि. ३१/०३/२०२४ मतदानानंतर लगेच स्थळ - मतदान ठिकाण नंतर जाहिर करण्यात येईल. | दि. ३१/०३/२०२४ रोजी मतमोजणी नंतर लगेचच. |
| २ | वैयक्तीक मतदार संघ | ०५ | | | | | | | | | |
| ३ | अनुसूचित जाती किंवा जमातीतील सदस्य | ०१ | | | | | | | | | |
| ४ | महिला प्रतिनिधी | ०२ | | | | | | | | | |
| ५ | विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय सदस्य | ०१ | | | | | | | | | |
| ६ | इतर मागासवर्गीय सदस्य | ०१ | | | | | | | | | |
| | एकूण | १५ | | | | | | | | | |

**वरील अनुसुचीमधील क्र. ०३ ते ०८ मधील कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये होईल. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता - कार्यालय, सहायक निबंधक, सहकारी संस्था ता. केज, जि.बीड कृषि उत्पन्न बाजार समिती, केजच्या जवळ, कळंब रोड, केज असा आहे. निवडणुकीसंबंधीत सर्व परिपत्रके, नियम व अनुषंगीक सुचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील. वरील अनुसूचीतील स्तंभ ३,४ व ७ मधील कामकाज शासकीय सुटीचे दिवस वगळून होईल.**

स्वाक्षरीत
(व्ही.एस.जगदाळे)
केज तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ म.केज, ता.केज, जि.बीड

(समृत जाधव)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,बीड

(अशोक गाडे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,पुणे

# खेळामुळे क्षमता वाढवण्यास मदत होते -जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

खेळामुळे क्षमता वाढवण्यास मदत होते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम येथे दिव्यांगाच्या मुला मुलींची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांना सुरुवात झाली या कार्यक्रमाचे उद्घाटन करते वेळी केले. यावेळी प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीता देवी पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके सहायक आयुक्त रवींद्र शिंदे व श्री नखाते साहेब यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकरी पुढे म्हणाले, खेळ आणि खेळाडू यांचे नाते अतुट असते, आवडी प्रमाणे कोणीही खेळू शकते दिव्यांग यांच्या क्रीडा स्पर्धा या त्यांच्या क्षमता वाढवण्यात मदतच करतात आंतरराष्ट्रीय स्तरावर पॅरा ओलंपिक मधून अनेक दिग्गज खेळाडू इतिहास घडविलेला आहे. यावेळी त्यांनी दिव्यांग खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. जिल्हा समाज कल्याण कार्यालय बीड व ग्रामीण महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था नाथापुर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २२ फेब्रुवारी व २३ फेब्रुवारी २०२४ रोजी बीड येथे दिव्यांगाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. यावेळी संगीता देवी पाटील यांनी आपल्या मनोगतातून दिव्यांग विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले तसेच दिव्यांग विद्यार्थी हे कोणतेही शिखर पार करू शकतात असा आत्मविश्वास त्यांनी दिला. यावेळी राज्यस्तरावर बक्षीस मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले त्यानंतर सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांनी यामध्ये अस्थिव्यंग, मूकबधिर, अंध व मतिमंद विद्यार्थ्यांनी मार्च पास द्वारे मान्यवरांना सलामी दिली. हे वातावरण अगदी नयनरम्य असा दिसून आला. दिव्यांगाच्या स्पर्धा या अनोख्या रीतीने घेण्याचा व त्यांना समाजाभिमुख बनवण्याचा मानस जिल्हा समाज कल्याण अधिकारी माननीय श्री शिंदे साहेब यांनी व्यक्त केला. या विद्यार्थ्यांना निवासासाठी अमृत मंगल कार्यालय व औटी मंगल कार्यालय येथे व्यवस्था करण्यात आली आयोजक व साईनाथ मतिमंद निवासी विद्यालय नाथापूर चे मुख्याध्यापक अशोक चव्हाण यांनी माहिती दिली कि,सर्व विद्यार्थ्यांचे जेवणाची व राहण्याची व्यवस्था अगदी चोखपणे करण्यात आलेली असून विद्यार्थ्यांनी व दिव्यांग शाळेतील कर्मचाऱ्यांनी याचा आनंद घ्यावा तसेच दिनांक २२ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी आठ वाजता अमृत मंगल कार्यालय येथे या दिव्यांग विद्यार्थ्यांचा कलाविष्कार सादर होणार असून यासाठीची तयारी अंतिम टप्प्यात आहे ही मुले आपल्या अंगातील कलागुण या संगीत रजनीच्या माध्यमातून प्रेक्षकांना दाखवणार असून त्याद्वारे मनोरंजन करणार आहेत.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील भोंडवे यांनी केले तर आभार उजगरे मॅडम यांनी केले.





बीड - महाराष्ट्र शासन कृषी विभागाअंतर्गत दिला जाणारा वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार सन २०२१ नेकनूर येथील प्रगतशील शेतकरी मित्र संजय ज्ञानोबा शिंदे यांना मिळाल्याबद्दल मंडळ कृषी अधिकारी नेकनूर व सहाय्यक प्रशासन अधिकारी श्री कल्याण अंभोरे, कृषी पर्यवेक्षक श्री खामकर डीडी, श्री विकास मुळे, कृषी सहाय्यक जे जे आवटे, व शेतकरी मित्र यांनी शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

## न्यू होम मिनिस्टर कार्यक्रमास महिला वर्गांची अलोट गर्दी

**आष्टी । प्रतिनिधी**

जामगावचे सरपंच राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे बुधवारी सायंकाळी पंचायत समितीच्या प्रांगणात महिलांसाठी हळदी कुंकू तसेच न्यू होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी झालेल्या विविध खेळांच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक उषा केरुळकर द्वितीय क्रमांक नेहा हंबर्डे तर तृतिय क्रमांक सीमा जानापुरे यांनी पटकावला.प्रामुख्याने मनोरंजन व प्रश्नमंजुषा व विविध उपक्रमास महिला वर्गांची अलोट गर्दी कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला. श्याम धस यांच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने महिला भगिनींसाठी खास 'खेळ पैठणीचा खेळ मनोरंजनाचा' सिने अभिनेते निलेश पापत यांच्या न्यू होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



## जातीअंत संघर्ष, निवारा हक्क समितीचा मोर्चा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील बेघर लोकांचा सर्व्हे करा यासह विविध आठ मागण्यांसाठी जातीअंत संघर्ष आणि निवारा हक्क समितीने शुक्रवार, दिनांक २३ फेब्रुवारी रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. या मोर्चात शेकडो बेघर, श्रमजीवी, कष्टकरी, कामगार स्त्री, पुरूष आणि युवक सहभागी झाले. यावेळी मोर्चेकऱ्यांना संबोधित करताना आधी घरकुल योजना राबवा व नंतरच सर्व कर वसूल करा असे कॉ.बब्रुवाहन पोटभरे म्हणाले. जातीअंत संघर्ष आणि निवारा हक्क समिती, अंबाजोगाई यांनी याप्रकरणी यापूर्वी अनेकदा मोर्चे काढले, निदर्शने केली आहे. तसेच विविध प्रकारची आंदोलने ही केली आहेत. वेळोवेळी निवेदने दिली आहेत. हा विषय सातत्यपूर्ण पध्दतीने लावून धरला आहे.



बीड - संभाजीराजे चौक येथे पिंपळनेर सर्कलमधील गावकऱ्यांनी विविध मागण्यांसाठी रस्ता रोको केला.

## पाणी पुरवठा प्रकल्पासाठी निधी मंजूर -आ.नमिता मुंदडा

**अंबाजोगाई । वृत्तसेवा**

उन्हाळा असो की पावसाळा, कायम पाणीटंचाईला तोंड देणार्या अंबाजोगाईकरांना सुखावणारी बातमी आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आ. नमिता मुंदडा यांच्या अथक प्रयत्नातून अंबाजोगाई शहराच्या पाणी पुरवठा प्रकल्पासाठी नगरोत्थान महाभियानातून तब्बल २०६ कोटी ७३ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. न भूतो न भविष्यती निधी मिळाल्याने अंबाजोगाईचे पाण्याची दुर्भिक्ष्य कायमस्वरूपी संपणार असून शहराला दररोज पाणी पुरवठा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अंबाजोगाई शहराला मुख्यत्वे धनेगाव येथील मांजरा प्रकल्पातून पाणी पुरवठा होतो. परंतु धरण क्षेत्रातील अंबाजोगाईचे पंपहाऊस पाळूपासून दूर असल्याने धरणाची पाणीपातळी कमी होताच अंबाजोगाईचा पाणी पुरवठा बंद होतो. त्यामुळे शहराला पावसाळ्यातही आठवड्यातून एकदा आणि उन्हाळ्यात तर महिन्यातून केवळ एक ते दोन वेळेसच पाणी पुरवठा होत असतो. परिणामी अंबाजोगाईकरांसाठी पाणी टंचाई ही नित्याची बाब झाली आहे. पुरेशा पाण्याअभावी नागरिकांचे होणारे हाल लक्षात घेत आ.नमिता मुंदडा यांनी अंबाजोगाई शहरासाठी नवीन पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. अनेकदा पत्र व्यवहार आणि काही वेळेस थेट मुख्यमंत्र्यांकडे जाऊन पाठपुरावा केल्यानंतर आ. मुंदडा यांच्या सातत्यपुर्ण प्रयत्नांना यश आले आहे. राज्य शासनाने शुक्रवारी (दि.२३) रोजी अंबाजोगाई शहराच्या पाणी पुरवठा प्रकल्पासाठी नगरोत्थान महाभियान अंतर्गत २०६ कोटी ७३ लाख रूपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून मांजरा प्रकल्पातील मुख्य पाळू जवळ अंबाजोगाईसाठी नवीन पंपहाऊस उभारण्यात येणार आहे. त्यामुळे धरणात पाण्याचा शेवटचा थेंब असेपर्यंत अंबाजोगाई शहराला पाणी पुरवठा करणे शक्य होईल. मांजरा प्रकल्पासून जवळपास ३५ किलोमीटर अंतराची अत्याधुनिक पाईपलाईन टाकून पाणी अंबाजोगाई शहरापर्यंत येणार आहे. तसेच शहरातील पाच ठिकाणी नवीन अधिक क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या बांधण्यात येणार आहेत. त्यासोबतच शहरातील सध्याच्या पाईप लाईनला समांतर नवीन पाईप लाईन टाकण्यात येणार असून त्याद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. या नवीन नळ योजनेमुळे शहराला मुबलक पाणी पुरवठा होणार असून नागरिकांना दररोज पाणी मिळणे शक्य होणार आहे. या प्रकल्पाचे कार्यान्वयन अंबाजोगाई नगर परिषदे मार्फत होणार आहे.





## टँकरच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार, एक जखमी

**केज । प्रतिनिधी**

केज - मांजरसुंबा रस्त्यावर शहरातील शिक्षक कॉलनीसमोर शुक्रवारी ( दि. २३ ) सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास एका भरधाव टँकरने दुचाकीला जोराची धडक दिल्याने या भीषण अपघातात टँकरचे चाक दुचाकीस्वाराच्या डोक्यावरून गेल्याने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला असून एक जण जखमी झाले आहे. केज तालुक्यातील उमरी येथील शेतकरी राजाभाऊ श्रीपती भैरट ( वय ५० ) व नरसिंग बळीराम भैरट ( वय ५५ ) हे दोघे शहरातून आठवडी बाजार करून शुक्रवारी सायंकाळी सहा वाजेच्या दुचाकीवर ( एम. एच. ४४ पी. ७४५३ ) बसून गावाकडे जात निघाले होते. केज - मांजरसुंबा रस्त्याने जात असताना शहरापासून जवळच असलेल्या शिक्षक कॉलनी जवळील मधूबन हॉटेलसमोर त्यांच्या दुचाकीला एका भरधाव टँकरने ( एम. एच. ४४ यू. ९४४४ ) जोराची धडक दिली. या झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील राजाभाऊ श्रीपती भैरट ( वय ५० ) यांच्या डोक्यावरून टँकरचे चाक गेल्याने त्यांच्या डोक्याचा चेंदामेंदा होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर दुचाकीवरील नरसिंग भैरट हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. पोलिसांनी धडक देणारे टँकर ताब्यात घेतले आहे. टँकर चालक फरार झाला आहे.

## कृषी विभागाच्यावतीने भव्य कृषी महोत्सव

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा बीड आयोजित बीड जिल्हा कृषी महोत्सव २०२४ या महोत्सवाचे बीड येथे पाच दिवस आयोजन करण्यात आले असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तंत्रज्ञानाची माहिती मिळावी व प्रगतीशील शेती करून भरघोस उत्पादन व आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने जिल्हाधिकारी दीपा मुधोळ - मुंडे,जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर, व प्रकल्प संचालक आत्मा सुभाष साळवे यांच्या सनियंत्रणाखाली बीड जिल्हा कृषी व महासंस्कृती महोत्सव २०२४ बीड येथे पाच दिवस संपन्न होणार असून तरी या भव्य कृषी महोत्सवात आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घ्यावा शेतीतील अत्याधुनिक तंत्रज्ञान, शासकीय योजना तसेच शेतकरी ते ग्राहक असा थेट शेतमाल विक्री करता येत आहे.कृषी पुरक उद्योगांची माहिती मिळणार आहे.या संधीचा फायदा घेऊन उत्पादन व व्यवसाय वाढीस चालना मिळणार असल्याने जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी लाभ घ्यावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी केले आहे.



कृषी विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील भव्य अशा कृषी महोत्सवाचे दि. २४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी या कालावधीत छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण मल्टीपर्पज ग्राऊंड छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे भव्य कृषी महोत्सव संपन्न होणार असून यामध्ये शेतकऱ्यांना नवतंत्रज्ञान मिळावे, कृषी प्रदर्शन,पशु प्रदर्शन,परिसंवाद,चर्चासत्र,उत्पादक ते ग्राहक थेट विक्री व्यवस्था, शेतकरी सन्मान समारंभ, आधुनिक कृषी अवजारे प्रदर्शन, शेतकरी उत्पादक कंपनी व सेंद्रिय शेती गट उत्पादित धान्य फळेफुले,भाजीपाला महोत्सव, आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षाच्या निमित्ताने पिकांना प्रोत्साहन म्हणून माहिती मिळणार आहे.भव्य कृषी प्रदर्शन शेतकरी मेळावा खरीददार विक्रीदार संमेलन शेतकरी मेळावा त्याचबरोबर खाद्य महोत्सव मेजवानी व शेतकरी व भेट देणाऱ्या नागरिकांना मिळणार आहे.कृषी प्रदर्शनात भव्य अशा २०० दालनाद्वारे कृषी उत्पादनाची कृषी अवजारे प्रात्यक्षिके या प्रदर्शनास पाहावयास मिळणार आहे तरी २५ फेब्रुवारी रोजी प्रदर्शनामध्ये श्वान, घोडे,पक्षी पाहावयास मिळणार आहेत त्यासाठी पशुप्रेमींनी सदर महोत्सवात प्रदर्शनामध्ये पशु ठेवण्याकरिता नोंदणी करणे आवश्यक आहे.दररोज सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून कार्यक्रमांमध्ये गायन,नृत्य स्पर्धा, गीते,छत्रपती शिवाजी राजा महानाट्य व,संगीत कार्यक्रम असे कार्यक्रम दररोज आयोजित करण्यात येणार आहेत. उल्लेखनीय कृषी क्षेत्रात कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांच्या गौरव करण्यात येणार आहे.तरी आष्टी तालुक्यातील नागरीकांनी शेतकरी बांधवांनी या संधाचा लाभ घ्यावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी केले आहे.

## दीपअंकुर ॲग्रो प्रोड्यूसरची चौकशी करा

नेकनूर - नेकनूर येथील दीपअंकुर ॲग्रो प्रोडूसर कंपनीला दिलेल्या अवजार बँक व जिरेनियम उद्योग यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून याची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी रामनाथ घोडके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात रामनाथ घोडके यांनी नेकनूर येथे असलेल्या दीप अंकुर ॲग्रो प्रोडूसर कंपनी केवळ शासनाच्या ६०% सबसिडीसाठी उभी राहिली यामुळे शासनाची फसवणूक झाल्याचा आरोप केला आहे. यामध्ये अवजार बँक व जिरेनियम उद्योग याचा समावेश असून त्यासाठी लागणारी मशिनरी व अवजारे बोगस पद्धतीने कृषी विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमताने बोगस टेंडर दाखवून ६० टक्के सबसिडी हडप केली या सर्व बाबीची सखोल चौकशी करून दोशी कडून शासनाने रक्कम वसूल करून कार्यवाही करावी अशी मागणी केली आहे.

## महिलेचे मुंडके क्षणात धडावेगळे

बीड : ज्वारीचे खळे करताना डोक्याला बांधलेले स्कार्फ मळणीयंत्रात अडकले. यामुळे यंत्रात अडकून महिलेचे मुंडकेच धडावेगळे झाले. ही घटना पाटोदा तालुक्यातील डोमरी येथे गुरुवारी दुपारी घडली. अंजना श्रीधर जगताप (वय ५५) असे मयत महिलेचे नाव आहे. सध्या ज्वारी, सोयाबीनचे खळे करण्यात शेतकरी व्यस्त आहेत. यासाठी मळणीयंत्र लावले जाते. त्यातच उन्हाचा चटकाही जाणवत असल्याने काम करताना महिला, पुरुष डोक्याला रूमाल, स्कार्फ बांधत असतात. हेच डोक्याला बांधलेले स्कार्फ एका महिलेच्या जिवावर बेतले. काम करताना अचानक डोक्याचे स्कार्फ सुटले आणि मळणीयंत्रात अडकले. यामुळे वेगाने सुरू असलेल्या यंत्रणाने अंजना जगताप यांना खेचले. यात यंत्रात मुंडके अडकल्याने धडावेगळे झाले. काही समजण्याच्या आतच या महिलेचा मृत्यू झाला. घटनेनंतर नातेवाइकांनी आक्रोश केला. शुक्रवारी सकाळी ११ वाजता डोमरी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## अल्पवयीन बालिकेवर अत्याचार करणाऱ्याला सक्त मजुरी

अंबाजोगाई - १३ वर्षीय अल्पवयीन बालिकेवर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीस दोषी ठरवत वीस वर्षे सक्त मजुरी व दहा हजार रूपये दंड. अशी शिक्षा येथील अप्पर सत्र न्यायाधीश व्ही.के.मांडे यांनी शुक्रवारी ठोठावली. शिलवान बब्रुवान लांडे, रा.रेवली असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणाची हकीकत अशी की, परळी तालुक्यातील रेवली येथील एका कुटूंबातील आई-वडील शेतात कामाला गेले होते. त्यांची पिडीत १३ वर्षीय मुलगी घरीच होती. ही संधी साधुन आरोपीने दि.२८ जुलै २०२० रोजी दुपारी तिच्या राहत्या घरात व शेळी बांधण्याच्या झोपडीत तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला. तसेच आरोपीच्या लहान अल्पवयीन भावानेही त्या पिडीतेचा विनयभंग केला. हा प्रकार सलग दोन वेळा घडल्याने फिर्यादीच्या आईने सिरसाळा पोलिस ठाण्यात आरोपी व त्याच्या अल्पवयीन असलेल्या भावाविरूद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल केला.

## निर्लेखनासाठी निविदा सादर करण्याचे आवाहन

बीड - शासकीय तंत्र प्रशाला केंद्र बीड यांच्या कार्यालयातील निर्लेखित केलेले फर्निचर व साहित्याची पुनर्विक्री निविदा पद्धतीने करायचे असून सदर निविदा दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ व २९ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत सुट्टीचा दिवस वगळून सादर करावयाच्या आहेत. सादर करायचे आहेत. विक्री करावयाचे साहित्य सुद्धा वरील ३ दिवसीय व कार्यालयीन वेळेत पाहता येईल. इच्छुक खरेदीदारांनी शासकीय तंत्र प्रशाला केंद्र बीड यांच्याशी संपर्क साधावा. इतर सविस्तर माहिती निविदेच्या अटी व शर्ती बाबतची माहिती भांडार विभागात पहावयास मिळेल. असे शासकीय तंत्र प्रशाला केंद्राचे मुख्याध्यापक यांनी प्रसिद्ध पत्रकाराव्दारे कळविले आहे.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com